# 1.दीक्षांत समारोह 2022

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था वडाळा,आणि लोकमंगल संस्थेच्या रौप्य महोत्सवा निमित आयोजित आय.टी.आय. दीक्षांत समारोह 01/10/2022 रोजी हा कार्यक्रम कार्यशाळेत पार पडला.या कार्यक्रमामध्ये आय.टी.आय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना ट्रेड सर्टिफिकेट देऊन सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून **नॅशनल इंस्टीट्यूट ऑफ मायक्रो,स्मॉल अँड मीडियम इंटरप्रायजेस,हैद्राबाद येथील डायरेक्टर जनरल डॉ.एस.ग्लोरीस्वरूपा** तसेच लोकमंगल संस्थेचे सर्वेसर्वा **माननीय सुभाष बापू देशमुख** व **लोकमंगल सायन्स एन्टरप्रिन्यूयरशिप कॉलेज वडाळा, चे प्राचार्य माननीय डॉ.सतीशकुमार दिनकरराव देवकर सर** यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.**लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री.वाय.बी.गायकवाड सर** यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

कार्यक्रमासाठी उपस्थित डॉ.एस.ग्लोरीस्वरूपा मॅडम यांनी आय.टी.आय मधील विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रातील संधी,संशोधन तसेच मिनिस्ट्री ऑफ मायक्रो,स्मॉल अँड मिडियम एन्टरप्रायजेस (MSME)कडून राबवण्यात येणाऱ्या स्टार्टअप योजनेबद्दल माहिती दिली व तसेच ग्रामीण भागातील युवकांनी स्वयंरोजगार बाबत प्रोत्साहित केले.

तसेच डॉ.सतीशकुमार दिनकरराव देवकर सर यांनी लोकमंगल संस्थेचे अध्यक्ष श्री.रोहनजी देशमुख यांनी ग्रामीण भागातील तरुणांना नवनवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या बद्दल त्यांचे अभिनंदन केले. व ग्रामीण भागातील तरुणांना विकासासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली.

कार्यक्रमासाठी उपस्थित लोकमंगल संस्थेचे सर्वेसर्वा माननीय सुभाष बापू देशमुख यांनी भारत सरकारच्या प्रधानमंत्री आत्मनिर्भर भारत या योजनेला आपल्या बहुमूल्य मार्गदर्शनातून अधोरेखित केले.त्याचप्रमाणे आय.टी.आय प्रशिक्षण घेऊन मुंबई-पुणे येथे न जाता आपल्या इथेच स्वयंरोजगार उभा करण्यासाठी विद्यार्थ्यांना उत्तेजित केले.

कार्यक्रमासाठी उपस्थित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे गुणवंत विद्यार्थी आदित्य जाधव प्रथम क्रमांक विजतंत्री विभाग, जोडारी विभागातून राहुल शिंदे तसेच यांत्रिकि डिझेल विभागातून संकेत प्रबळकर आणि यांत्रिकि मोटर सायकल विभागातून ऋषिकेश लिंगफोडे यांचा सत्कार समारंभ पार पडला.






Lokmangal
Institute,
Convocation
Chief Guests


realme Shot on realme X7 5G